# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक १३ जुलै, २०१२
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे -**

**संसदीय कार्य मंत्री** "विधानपरिषदेच्या सन २०१२ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक १५ मार्च ते २० एप्रिल, २०१२ या कालावधीत मा.मंत्री / मा.राज्यमंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या एकूण ७९० आश्वासनांची यादी तसेच सन १९८६ च्या चौथ्या अधिवेशनापासून ते सन २०१२ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनापर्यंतच्या कालावधीत विधानपरिषदेत देण्यात आलेल्या एकूण ३३१ आश्वासनांवरील पूर्ततेसंबंधीच्या कार्यवाहीच्या माहितीच्या विवरणपत्रांची यादी" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : (अ) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - असल्यास.**

**(ब) म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - असल्यास.**

**चार : लक्षवेधी सूचना- (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

(१) **श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"विक्रीकर विभागाच्या दक्षता पथकाने गेल्या २ महिन्यांपासून राज्यात मुंबई, पुणे, नागपूर व इतर ठिकाणी छापे घालून प्रत्यक्षात माल न पुरवता विक्री कराचा अंतर्भाव असलेली खोटी बिले देणाऱ्या ९८० हवाला व्यापाऱ्यांचा छडा लावल्याची घटना मार्च, २०१२ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस येणे, या ९८० हवाला व्यापाऱ्यांनी सुमारे ९०० कोटी रुपयांचा विक्रीकर चुकविला असल्याचे निष्पन्न होणे, अशाप्रकारे विक्री कराची वजावट घेणाऱ्यांची किंवा लाभार्थ्यांची संख्या ३० ते ३५ हजार असणे, यात मुख्यतः लोहखनिज, पोलाद व रसायनांच्या विक्रीच्या बहाण्याने असा प्रकार मोठ्या प्रमाणात करणे, नोंदणी दाखला मिळाल्यावर खरेदीदाराला माल न पुरविता केवळ विक्रीची बिले देणे, या बिलांमध्ये विक्रीकराची आकारणी केलेली दाखविली असतानाही प्रत्यक्षात विक्रीकराची रक्कम सरकारी

तिजोरीत भरली न गेल्यामुळे शासनाच्या महसूलाचे मोठ्या प्रमाणात होणारे नुकसान, याबाबत शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबतची शासनाची भुमिका."

(२) **श्री. राजेंद्र जैन, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यात दूषित पाण्यापासून उद्‌भवणाऱ्या सांसर्गिक आजारांपासून नागरीकांचा बचाव करण्यासाठी शासनाकडून अनेक प्रतिबंधक उपाययोजना राबविण्यात येत असून देखील गोंदिया जिल्ह्यात पाण्याच्या १ हजार ३१२ नमुन्यापैकी १८४ नमुने दूषित असल्याचे सर्वेक्षणातून नुकतेच निदर्शनास येणे, यासंबंधी राज्याच्या पाणीपुरवठा विभागाकडून मागविण्यात आलेल्या अहवालात गोंदिया तालुक्यात १९३ पैकी २७ नमुने, आमगांव ७२ पैकी ८, गोरेगाव १४८ पैकी १७, तिरोडा ११५ पैकी ३३, अर्जुनी मोरगाव ३१२ पैकी ५३, सालेकसा १०५ पैकी ३ आणि देवरी तालुक्यात ३५ पैकी ४ नमुने दूषित असल्याचे स्पष्ट होणे, या दूषित पाण्यामध्ये क्लोरोफार्म, बॅक्टेरिया, थॅयरोटोलम, नायट्रेड, प्लोराईडसारख्या मानवी आरोग्यास अपायकारक घटकांचे प्रमाण अधिक असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये दुर्धर साथरोगांची झालेली लागण, प्रतिबंधक उपयायोजना म्हणून आयएसआय मार्क ब्लिचींग पावडरमध्ये क्लोरीनची निश्चित प्रमाणात टक्केवारी आणि अधिकृत कंपन्याकडून खरेदी करण्यात येणाऱ्या ब्लिचींग पावडरची प्रयोगशाळेत तपासणी करून ग्रामपंचायतस्तरावर त्याचा रितसर पुरवठा करण्याची नितांत आवश्यकता यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री. रामदास कदम, वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची विशेष पट पडताळणी करण्यात आलेली असून, शासन निर्णय दिनांक ०२ मे, २०१२ नुसार ज्या माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी आढळून आलेली आहे त्या शाळेतील शिक्षक व कर्मचारी अतिरिक्त ठरणार आहेत, अशा अतिरिक्त शिक्षकांचे समावेशन करण्याचे शासनाने ठरविले असल्यामुळे, सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात नवीन शिक्षक / कर्मचारी यांच्या नियुक्तीबाबत जाहिरातीस परवानगी देण्यात येवू नये किंवा ना-हरकत प्रमाणपत्रही देण्यात येवू नयेत, असे आदेश शासनाने दिलेले असणे, वास्तविक दिनांक ०३ ते ०५ ऑक्टोबर २०११ चे दरम्यान झालेल्या विशेष पट पडताळणीमध्ये रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकही माध्यमिक अथवा उच्च माध्यमिक शाळा दोषी आढळलेली नसणे, ज्या

जिल्ह्यांमध्ये अशाप्रकारे बनावट विद्यार्थी संख्या दाखवून शिक्षक / कर्मचारी नियुक्ती केलेले आहेत त्यांना त्याच जिल्ह्यात सामावून घेण्याची आवश्यकता, रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील शिक्षण संस्था पट पडताळणीमध्ये दोषी न आढळल्याने त्या संस्थामध्ये अशाप्रकारे अतिरिक्त झालेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना नियुक्त्या दिल्यास कोकणामध्ये शिक्षणाचे काम करणाऱ्या प्रामाणिक शिक्षण संस्थांवर अन्याय होईल, शासनाने काढलेला आदेश रद्द करण्यात यावा व रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्हे वगळून अतिरिक्त शिक्षण व कर्मचाऱ्यांच्या त्या-त्या जिल्ह्यांत नियुक्ती देण्याबाबतचे फेर आदेश काढण्यात यावेत, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

(४) **सर्वश्री. रामनाथ मोते,** विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो गाणार, परशुराम उपरकर वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्य शासनाच्या वतीने इयत्ता ४ थी व इयत्ता ७ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन होणे, गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून शिष्यवृत्ती मिळणे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक विद्यार्थी गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीस पात्र असणे, गेल्या ३-४ वर्षातील शिष्यवृत्तीची रक्कम शासनाकडून प्राप्त होऊनही संबंधीत विद्यार्थ्यांना अदा न होणे, शिक्षण विभागातील कर्मचारी व अधिकारी यांनी आलेली रक्कम विद्यार्थ्यांना अदा न करता बॅकेतून काढणे व या निधीचा अपहार करणे, जिल्हा प्रशासनाने व वरिष्ठ कार्यालयाने पालकांच्या तक्रारीची दखल न घेणे, गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित ठेवणे, पालकांमध्ये व शिक्षकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

(५) **श्री. राजन तेली, वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्याच्या मत्स्यव्यावसायीकांना चालना मिळण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या योजनेतून देण्यात येणाऱ्या कर्जाचे प्रस्ताव मागील ४-५ वर्षापासून त्या-त्या वेळच्या किंमती प्रमाणे राज्य शासनामार्फत एनसीडीसी (पुणे) कार्यालयाकडे सादर झालेले असून मंत्रालयीन अधिकारी वर्गाच्या दप्तर दिरंगाईमुळे वर्षानुवर्षे सदर प्रकरणे प्रलंबित राहणे, तथापी नवीन किंमतीच्या निविदा देऊनही सदर प्रस्तावाची कर्जे मंजुर करताना गत ४-५ वर्षापूर्वीचे निविदामूल्यांप्रमाणे प्रस्ताव मंजूर करणे, परिणामी लाभार्थी मत्स्यव्यवसायी सहकारी संस्थाना अतिरिक्त स्वभांडवलातून प्रकल्प उभारणीसाठी खर्च करावे लागण्याची निर्माण झालेली

गरज; सिंधुदुर्ग भद्रकाली मत्स्यव्यवसायी सहकारी संस्थेने नवीन निविदा सादर करुनही जुन्या दरानुसार कर्जे मंजूर करण्यात आल्यामुळे ४ ते ४.५ लाखाचा आर्थिक तोटा सोसण्याचा अलिकडेच निदर्शनास आलेला प्रकार, सदर मत्स्यव्यवसायीकांनी सहकारी संस्थांची आर्थिक परिस्थिती नसल्याने त्यांना प्रकल्प ऊभा करणे अश्यक्यप्राय होणे, राज्यातील सर्वच मत्स्यव्यावसायीक संस्थांना पुरेशा निधी अभावी प्रकल्प पूर्ण होणार नसल्याची निर्माण झालेली भीती, मत्स्यव्यावसायीकांमध्ये पसरलेला तीव्र संताप याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**पाच : विशेष उल्लेख सूचना - असल्यास -**

**<u>दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर</u>**

## अशासकीय कामकाज

### (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**सहा : अशासकीय ठराव -**

**(बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार हे ठराव दाखविण्यात आले आहेत.)**

**(१) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ८० -**

"भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भारताची घटना लिहिली असून त्यांची किर्ती संपूर्ण जगात पसरलेली आहे. भारतीय जनतेचे त्यांच्यावर अतिशय प्रेम आहे. भारतीय जनतेचे लाडके नेते डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे दादर येथील हिंदू कॉलनीतील राजगृह येथे राहत होते. दादर याच ठिकाणी त्यांचे स्मारक असून त्यांच्या वापरातील अनेक मौल्यवान वस्तू तेथे ठेवण्यात आलेल्या आहेत. दिनांक १४ एप्रिल व ६ डिसेंबर, या दिवशी या महामानवाला अभिवादन करण्यासाठी देशातील लाखो अनुयायी याठिकाणी येत असतात. अशा या महामानवाचे नाव देशातील सर्व जनतेच्या चिरंतर स्मरणात राहण्यासाठी दादर रेल्वे स्थानकाचे "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्थानक" असे नामकरण करण्यासाठी राज्यातील सर्व अनुयायी यांनी अनेक वर्षांपासून करण्यात आलेल्या मागणीचा विचार होऊन त्याबाबत आग्रही भूमिका केंद्र शासनाकडे धरावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(२) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १३४ -**

"राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत

असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३) **डॉ. निलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६८ -**

"बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम, २००० अनुसार देशातील सर्व मुलांच्या संरक्षणाची जबाबदारी शासनावर आहे. परंतु सदर कायद्याची माहिती राज्यातील बहुतेक पोलिस स्टेशनमधील पोलिस अधिकाऱ्यांना नाही. प्रत्येक जिल्हयात पोलिसांची जिल्हा पातळीवर विशेष बाल पथके नियुक्त करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे राज्यात बालकांवरील अत्याचारांची संख्या दिवसेंदिवस वाढत जाणे व देशात महाराष्ट्र राज्य तिसऱ्या स्थानावर आहे. त्यामुळे सदर कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यात प्रभावीपणे व काटेकोरपणे करण्यात यावी आणि बालहक्क आयोगास आर्थिक सहाय्य करुन तो सक्षम करण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १२ जुलै, २०१२.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.